शब्दांना सत्याची धार
प्रहार
RANE PRAKASHAN PRIVATE LIMITED

# पाटकर-वर्दे कॉलेजची दिव्यांगांसाठी सायबर जागरूकता मोहीम



◆ मुंबई (प्रतिनिधी) :

पाटकर-वर्दे कॉलेजच्या सायबर फिनिक्स क्लबतर्फे रोटरी संस्कारधाम ॲक्टिव्हिटी सेंटर येथे दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी विशेष सायबर जागरूकता सत्राचे आयोजन करण्यात आले. क्विक हील फाऊंडेशनच्या सहकार्याने राबविण्यात येणाऱ्या देशव्यापी 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' मोहिमेअंतर्गत हा उपक्रम पार पडला.

सायबर वॉरियर्स शिल्पीशिवम सिंग आणि रिया मिश्रा यांनी विद्यार्थ्यांना डिजिटल जगात सुरक्षित राहण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन केले. संस्कारधाम विद्यालय हायस्कूलच्या माध्यमातून आयोजित या परस्परसंवादी सत्रात सायबर गुन्हेगारीच्या विविध पद्धती, ओटीपी आणि पासवर्डची सुरक्षितता, एआय व्हॉईस क्लोनिंगचे धोके, ऑनलाईन गेमिंगमधील फसवणूक, डिजिटल फूटप्रिंट्स, मालवेअरचा धोका तसेच सायबर संकटाच्या वेळी तातडीने कोणती पावले उचलावीत, याविषयी सविस्तर माहिती देण्यात आली.

विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत विविध शंकांचे निरसन करून घेतले. संस्थेच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमात सायबर वॉरियर्सच्या सामाजिक बांधिलकीचे आणि दिव्यांग विद्यार्थ्यांपर्यंत सायबर सुरक्षेचे ज्ञान पोहोचवण्याच्या प्रयत्नांचे कौतुक करण्यात आले.

Mumbai Edition
Aug, 05 2026 Page No, 3
https://epaper.prahaar.in